# वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा हिवरे बाजार येथे अभ्यासदौरा

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

नाशिक येथील सूर्योदय फाउंडेशन आणि के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आदर्श गाव हिवरे बाजार (ता. जि. अहिल्यानगर) आणि माउली सेवा प्रतिष्ठान, शिंगवे नाईक (ता. जि. अहिल्यानगर) येथे अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या दौऱ्यावेळी पद्मश्री पुरस्कारप्राप्त व ग्रामविकासाचे प्रेरणास्थान पोपटराव पवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख प्रा. स्वानंद डोंगरे,सूर्योदय फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश टिळे, सचिव ज्ञानेश्वर भोर, प्रा. रोहित भास्कर व विद्यार्थी उपस्थित होते. अभ्यासदौऱ्यात सहभागी विद्यार्थ्यांनी गावातील विविध प्रकल्पांना प्रत्यक्ष भेट देत त्यांचा अभ्यास केला. यानंतर विद्यार्थ्यांनी हिवरे बाजार येथे यशदा, पुणे या धर्तीवर उभारण्यात आलेल्या प्रशिक्षण केंद्राला भेट देत तेथे सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती घेतली. डॉ. राजेंद्र धामणे यांच्या माउली सेवा प्रतिष्ठानअंतर्गत मनगाव प्रकल्पास भेट देत, त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती घेण्यात आली. या अभ्यासदौऱ्यात के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील शंभर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



Gavkari, Date: 15/07/2025